# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

---

**दिनांक ०१.०९.२०२६ मंगळवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ३१.०८.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये १० केसेसमध्ये १० ईसमावर कारवाई करून एकुण ११,७८०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०३ केसेसमध्ये ०३ इसमांवर कारवाई करून एकुण २,०५०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,७७७ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. ३,१७,०००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक ३१.०८.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ०१.०९.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०६ ईसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) एस्कॉर्ट पथकाची कामगिरी :— अवैध हुक्का पार्लर चालकांविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०१.०९.२०२६ चे ०२.३० ते ०२.५५ वा. चे दरम्यान, एस्कॉर्ट पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत, उमरेड रोड, दिघोरी येथील 'टेक्सॉस स्मोकींग शॉपी' येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे कॅफे मॅनेजर आरोपी क्र. १) ओंकार संदीप मडावी, वय २० वर्ष, रा. प्लॉट क्र. ३५, आदर्श नगर, उमरेड रोड, नंदनवन, नागपूर हा ग्राहकांना शासनाने प्रतिबंधीत केलेला तंबाखुजन्य हुक्का पदार्थ सेवनाकरीता पुरवितांना समक्ष मिळुन आला. आरोपी क्र. १ यास स्मोकींग शॉपीचे मालकाबाबत विचारणा केली असता, शॉपीमालक आरोपी क. २) अविनाश पर्वतलाल पांडे रा. साईनगर, उमरेड रोड, वाठोडा, नागपूर हा असल्याचे सांगितले. तसेच, परवानाविषयी विचारणा केली असता, त्याने कोणताही परवाना सादर केला नाही. आरोपी हे विनापरवाना स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता अवैधरित्या हुक्का पार्लर चालवित असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीचे ताब्यातुन रोख ३८,१००/—रु. व हुक्का पार्लरकरीता उपयोगात येणारे साहित्य वेगवेगळया आकाराचे हुक्का पॉट, नळया, वेगवेगळे फ्लेव्हरचे तंबाखुजन्य हुक्का व ईतर साहित्य असा एकुण ९४,२४०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. कॅफेमालक व मॅनेजर यांचेविरूध्द पोलीस ठाणे वाठोडा येथे कलम ४अ,२१अ,२७अ सिगारेट आणि ईतर तंबाखु उत्पादने अधिनीयम—२००३, महाराष्ट्र सुधारणा अधिनीयम—२०१८ सहकलम ३३ म.पो.का. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनात सपोनि. भगवान कोळी व त्यांचे पथकातील पोलीस अंमलदार तसेच, पो. ठाणे वाठोडा येथील सपोनि. संतोष सपाटे, पोउपनि. संजय बन्सोड, पोहवा. गणेश बोंद्रे, पोअं. सुरेंद्र बुदुरकर यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे गणेशपेठ :— घरफोडी करणाऱ्या आरोपीस तात्काळ अटक.**

दिनांक ३०.०८.२०२६ चे २१.३० वा. ते दिनांक ३१.०८.२०२६ चे ०१.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे गणेशपेठ हद्यीत जुना जेलखाना, बशिर बेकरी समोर, हज हाऊसचे बाजुला, नागपूर येथे राहणारे फिर्यादी मुजाहीद कैसल अताउल्लाह खान वय २७ वर्ष यांचे साक्षंगध कार्यक्रम एसएस सेलिब्रेशन हॉल येथे असल्याने ते आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह कार्यक्रमाकरीता हॉलमध्ये गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलुप तोडुन, घराचे आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीचे लॉकरमधील रोख ५०,०००/—रू. चोरून नेले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गणेशपेठ येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करुन, गणेशपेठ पोलीसांचे तपास पथकाने तात्काळ दखल घेऊन तसेच, तांत्रिक तपास करुन आरोपीचा शोध घेतला व आरोपी शब्बीर खान अमिरउल्लाह खान वय ४० वर्ष रा. बशिर बेकरीसमोर, जुना जेलखाना रोड, शोयेब किराणाजवळ, गणेशपेठ, नागपूर यास दिनांक ३१.०८.२०२६ चे २३.०० वा. अटक केली आहे. आरोपीचे ताब्यातुन संपुर्ण रोख मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे मानकापुर :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०१.०९.२०२६ चे ०२.४० वा. चे सुमारास, फिर्यादीचा मित्र नामे अमनकुमार लालचंद डहारे वय २१ वर्ष रा. हजारीपहाड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयाजवळ, नागपूर हा जेवणाचे पार्सल घेण्यासाठी त्याचे बर्गमन मोपेड क्र. एमएच ४९ बीयु ६६३८ ने पोलीस ठाणे मानकापुर हद्यीत फरस उडाणपुलावरुन जात असता, मानकापुर रोडकडून कोराडीचे दिशेने जाणारी पांढरे रंगाचे हुंदई कारचे चालकाने त्याचे ताब्यातील कार भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मित्राचे मोपेडला जोरदार धडक देऊन घटनास्थळावरुन पळून गेला. अपघातामध्ये फिर्यादीचा मित्र मोपेडसह खाली पडल्याने त्याचे डोक्याला व गुप्तांगाला गंभीर मार लागल्याने, त्यास उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी स्वप्निल सुनिल सायरे वय ३० वर्षे रा. जयहिंद शाळेजवळ, शिर्के नगर, गुलशन नगर, कळमणा, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे मानकापूर येथे सपोनि. अमित बकतवार ९९७०४६९५५५ यांनी आरोपी कार चालकाविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या.सं. सहकलम १३४,१७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे कळमणा :—शस्त्र बाळगुन धुमाकुळ घालणारे आरोपींना अटक.**

दिनांक ३१.०८.२०२६ चे १९.५० ते २०.५० वा. चे दरम्यान, कळमणा पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, विजयनगर दारुभट्टीचे बाजुला दोन इसम शस्त्र घेवून येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना शिवीगाळ करून धुमाकुळ घालत आहेत. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचे दोन इसम दिसुन आले. त्यांना ताब्यात घेऊन, पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांची नावे १) करण घनश्याम पाल वय २६ वर्षे रा. सावरकर ले आऊट, विजयनगर, कळमणा, नागपूर २) रुपेश डोम वर्मा वय २३ वर्ष रा. रामभुमी नगर, विजय नगर, कळमणा, नागपूर असे सांगीतले. त्यांची

अंगझडती घेतली असता, करण पाल याचे कंबरेत पॅन्टचे आत लपविलेला एक धारदार लोखंडी चाकु किंमती ५००/—रू. चा मिळून आल्याने, जप्त करण्यात आला.

आरोपी हे दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगुन धुमाकुळ घालतांना समक्ष मिळुन आल्याने व त्यांनी मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. विशाल भैसारे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे कळमणा येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपींना अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>४) पोलीस ठाणे राणा प्रतापनगर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २६.०८.२०२६ चे १९.३० वा. ते दिनांक ३०.०८.२०२६ चे २२.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे राणा प्रतापनगर हद्दीत प्लॉट क्र. ५१४, एमआयजी कॉलनी, त्रिमुर्ती नगर, नागपूर येथे राहणारे फिर्यादी नरेंद्र वसंत शर्मा वय ६१ वर्ष हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह राखी सणाकरीता बहिणीचे घरी गोंदिया येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कडी कोंडा व कुलुप तोडुन, घराचे आंत प्रवेश करून, बेडरूममधील आलमारीतील रोख ९०,०००/—रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने व घडयाळ असा एकुण किंमती ३,६७,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे प्रतापनगर येथे पोउपनि. प्रशांत खोत ९०४९२०२२२९ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**